ISSN: 2347-2723 Impact Factor : 2.0260(UIF) Volume - 4 | Issue - 2 | September - 2016

Review of Literature

# डॉ. राममनोहर लोहियांची इंग्रजी भाषा हटावची भूमिका


**प्रो. डॉ. भगवान माने**
राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

## प्रस्तावना

डॉ. राममनोहर लोहिया यांचे समता, राष्ट्रीयत्व, रचनात्मक राजकारण, अस्पृश्यता निवारण, भारत – पाकिस्तान फाळणी,वर्णभेद,अर्थशास्त्र,भारतीय संस्कृती,इतिहासचक्र लोकशाही समाजवाद इत्यादी संबंधीचे विचार मूलगामी स्वरूपाचे आहेत. त्याचप्रमाणे भाषा आणि लोकभाषा, जाती आणि वर्गासंबंधी त्यांनी मांडलेले विचार वस्तुनिष्ठ आणि मूलभूत आहेत. स्वातंत्र्याच्या आंदोलनात इंग्रजांना हद्दपार केले परंतु आपण इंग्रजी भाषेचे गुलाम झालो. इंग्रजीला दिल्या जाणा–या प्रतिष्ठेमुळे आपली प्रगती खुंटली, म्हणून डॉ. लोहियांनी इंग्रजी भाषा हटावची आग्रही भूमिका घेऊन मातृभाषा हे भारताच्या प्रगतीचे मुख्य कारण आहे. अशी त्यांची धारणा होती. संस्कृती आणि भाषेचे जतन व्हावे, हिंदी भाषेला ज्ञान–विज्ञान आणि शासकीय व्यवहाराचा दर्जा देऊन हिंदी भाषेला प्रतिष्ठा मिळावी यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अद्वितीय आहेत.

## डॉ. राममनोहर लोहिया यांचा भाशेकडे पाहण्याचा दृश्टीकोण

व्यक्तीचा सर्वांगीन विकास घडविण्यामध्ये भाषा हा घटक महत्वाचा आहे. मानवी इतिहासात भाषेला महत्वाचे स्थान असून ते ज्ञानसंक्रमणाचे, अनुभवजन्य आणि बुध्दिप्रामाण्य साधन आहे. भाषा ही संक्रमीत होते. त्यामुळे पुढील पिढीस भाषेचा उपयोग होतो. संस्कृतीचा ठेवा आणि ज्ञान – विज्ञानाची मांडणी करण्यास मातृभाषा प्रभावी कार्य करू शकते. मातृभाषा ज्ञानाची देवाणघेवाण करणारे सुलभ आणि सोयीचे माध्यम आहे. भाषा हे व्यक्ती – व्यक्ती, व्यक्ती–समाज, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम आहे. डॉ. लोहियांच्या मते 'ज्याप्रमाणे आई मुलाचे व्यक्तीमत्व घडविते त्याचप्रमाणे मातृभाषा व्यक्तीचा सर्वांगीन विकास घडविते.' परंतु आपण इंग्रजी भाषेचा शासनव्यवहारात वापर केल्याने सर्वसामान्य जनतेची इंग्रजी लिहिता वाचता आणि बोलता येत नसल्यामुळे पिळवणूक होत आहे. याबाबत डॉ. राममनोहर लोहिया असे म्हणतात की '' भाषा हे प्रभावी हत्यार आहे. भारताच्या शासक आणि शोषक वर्गाच्या हातातील पिळवणूकीचे हत्यार जोवर हिसकावून घेतले जात नाही, तोवर त्यांची सत्ता आबाधीत राहिल'. यावरून असे स्पष्ट होते की भाषा हे विनिमय, अर्थ आणि संकेताचे प्रभावी साधन म्हणून कार्य करते. भाषेमुळे समाजव्यवहार,शासकीय व्यवहार व्यक्ती–व्यक्तीमधील व्यवहार, ज्ञान–विज्ञानातील परिभाषा, संकल्पना इत्यादीचे पृथःकरण करण्यास भाषा उपयुक्त ठरते. असे असताना इंग्रजी भाषेमुळे बहुसंख्य सामान्य जनतेला तिचा व्यवहारात उपयोग होत नसल्यामुळे अशा भाषेला देशातून हद्दपार करण्याबाबत डॉ. राममनोहर लोहियांनी घेतलेली भूमिका योग्यच आहे.




## भाषा : सामाजिक – आर्थिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम

भाषा म्हणजे केवळ संकेत नव्हे तर विश्वातील विविध घडामोडीत गुंतलेल्या परस्पर संबंधांचे संकेतांची ती पध्दतशीर मांडणी असते. डॉ. राममनोहर लोहिया यांनी भाषेकडे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे महत्वाचे साधन म्हणून पाहिले आहे. त्यांनी भाषेचा आणि समाजाचा अतूट संबंध जोडला आहे. मातृभाषा हा राष्ट्राच्या विकास,प्रगती,परिवर्तन,संघर्ष,ज्ञान–विज्ञान आणि नवपर्वतनाचा पाया आहे असे ते मानत.

परंतु सत्ताधारी राज्यकर्त्यांनी शासनव्यवहारात इंग्रजी भाषेचा मोठया प्रमाणावर वापर सुरू केला त्यामुळे कोठयावधी जनतेला इंग्रजी आकलन न झाल्याने भारतीयांची प्रगती खुटली आणि मूठभर इंग्रजी बोलणा–या सामंत वर्गाला प्रतिष्ठा मिळाली म्हणून इंग्रजी भाषा हटावचा प्रश्न हा मूटभरांची भाषा विरूध्द लोकभाषा असा आहे.

डॉ. राममनोहर लोहियांनी भाषा आणि लोकव्यवहाराचा परस्पर संबंध जोडला आहे. राष्ट्राच्या सामाजिक,आर्थिक अणि राजकीय विकासामध्ये मातृभाषा महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. मातृभाषा आणि लोकभाषेमुळे लोकव्यवहार वाढण्यास चालना मिळते. परंतु इंग्रजी भाषेमुळे देशाचे भयंकर नुकसान होत आहे. ती मूठभर लोकांची भाषा विशाल जनसमुदायावर सत्ता गाजविण्याचे आणि त्यांचे शोषण करण्याचे कार्य करते. भारतात इंग्रजी भाषेचे स्तोम माजल्यामुळे कोणतेही सार्वजनिक काम करण्यास आपण लायक नाही अशा भावनेने देशातील कोटयावधी

लोक उदासिन आणि विरक्त बनलेले दिसतात. त्यांनी आत्मविश्वास गमविला आहे. इंग्रजी येत नसल्यामुळे ते कच खातात, सरकारी कामकाजात पुढे येत नाहीत. त्यामुळे त्यांचा व्यक्तीविकास खुंटला जातो. आणि त्याचा राष्ट्राच्या जडणघडणीवर विपरित परिणाम होतो.

### *लोहिया : भाषावाद आणि भाषानीती*

भाषावादासंबंधी वेगवेगळे दृष्टिकोण आणि विचारप्रवाह आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात भाषेचा प्रश्न अधिक गंभीर बनला. कारण गैरहिंदीभाषी प्रातांनी हिंदी भाषेबाबत पाहिजे तेवढया प्रमाणात औदार्य दाखविले नाही. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे इंग्रजांनी भाषानीतीचा अवलंब करून इंग्रजी भाषेचे स्तोम माजविले. मूठभर शासक आणि सनदी अधिका—यांनी इंग्रजीबरोबर तेलगु, मल्याळम, बंगाली, मराठी, कन्नड भाषांना स्थान दिले मात्र सर्व प्रांतामध्ये इंग्रजी ही प्रमुख भाषा ठेवली इंग्रजांच्या नंतरही सत्ताधारी राज्यकर्त्यांनी राज्या—राज्यामध्ये वेगवेगळी भाषाविषयक धोरणे राबवून फोडा आणि झोडा नातीचा अवलंब केला त्यामुळे मातृभाषा,लोकभाषा आणि इंग्रजीमध्ये द्वंद्व निर्माण करून हिंदी भाषा विरूध्द इंग्रजी भाषा असा वाद निर्माण केला. त्याचा दूरगामी दुष्परिणाम म्हणजेच उत्तर — दक्षिण असा भाषावादही निर्माण झाला.

### *लोहियांची भाषेसंबंधी संस्कृती संघर्षाची भूमिका*

भाषा ही संस्कृतीचे प्रतिनिधित्व करते. डॉ. लोहियांनी इंग्रजी हटावाची भूमिका संस्कृती संघर्षातून मांडलेली आहे. कारण दोन भाषांचे भिन्नत्व हे त्या भाषांच्या संबंधीत समाजजीवनातील भिन्नतेवर अवलंबून असते. भाषेमुळे बाहय विश्वाकडे पाहण्याची समाजाची निष्ठा, बाहयविश्वाकडे त्याने केलेले विशिष्ट पृथक्करण हे त्याच्या भोवतालच्या पर्यावरणार आधारित असते. त्यामुळे मातृभाषा आणि लोकभाषेचे महत्व मोठे आहे. भाषेमध्ये सामाजिकत्व आणि ऐतिहासिकत्व असते. परंतु इंग्रजी भाषेचे भूत आपल्या डोक्यात घुसल्यामुळे आपणाला आपल्या संस्कृतीचे सम्यक दर्शन होत नाही. कारण इंग्रजी ही परकिय संस्कृतीची भाषा आहे. इंग्रजी भाषेमुळे देशाची अधोगती झालेली पाहिल्याने डॉ. लोहियांनी 'अंग्रेजी हटाव' आंदोलन सुरू केले होते. डॉ. लोहिया इंग्रजीला हटवू पाहत होते. परंतु तिच्या जागी हिंदी भाषाच यावी असा त्यांचा आग्रह नव्हता. देशी भाषांविरूध्द इंग्रजी या दृष्टिकोणातून त्यांचा हा संघर्ष होता. त्यांच्यापुढे खरा प्रश्न हिंदी भाषेच्या प्रतिष्ठेचा नव्हता तर इंग्रजी भाषा हटविण्याबाबत होता.

डॉ. लोहियांनी भाषेसंबंधी अत्यंत मूलगामी विचार मांडले आहेत. याची जाणीव त्यांच्या 'ज्ञानभाषा' या विचारातून होते. प्रत्येक राष्ट्राने ज्ञानभाषेला महत्व दिलेले आहे. आणि ज्ञानभाषा ही देशभाषा असली पाहिजे यावर ते ठाम होते. चीन,जपान, इस्त्राइल, रशियाने आपल्या व्यक्तीगत लोकभाषांच्या माध्यमातून विविध क्षेत्रात उल्लेखनिय प्रगती केली आहे. परंतु देशभाषा जिवंत असताना इंग्रजीचा स्वीकार करणारा हिंदुस्थान हा एकच देश आहे. भारतात इंग्रजी भाषेमुळे गणित, स्थापत्यशास्त्र, विज्ञान नक्षज्ञान इत्यादींचे संशोधनकार्य सीमीत झाल्याची खंतही लोहियांनी व्यक्त केली आहे. देशातील विश्वविद्यालयात इंग्रजी भाषेचा सर्रास अवलंब केल्याने अन्य शिक्षण घेणा—या असंख्य विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाचे उपयोजन करता येत नाही. म्हणून इंग्रजीच्या गाढव ओझ्यापासून विद्यार्थ्यांची मुक्तता करून हिंदी भाषेचा विश्वविद्यालयात ज्ञानभाषा म्हणून अवलंब करावा हा ज्ञानभाषेसंबंधी मांडलेला विचार अत्यंत मौलिक असा आहे.

### *भाषानीती : डॉ. लोहिया विरूध्द पंडित नेहरू*

आपल्या स्वातंत्र्याचा आधार हिंदी भाषा आहे. हिंदी भाषेमुळे स्वातंत्र्याच्या आंदोलनाला वेगळी धार मिळाली होती. हिंदी भाषेनेच सर्वांना जोडले होते. परंतु स्वातंत्र्यानंतर स्वार्थी राज्यकर्त्यांनी हिंदीभाषेचा राजकारणात हत्यार म्हणून उपयोग करून भारताच्या अखंडतेचा भंग केला याचे खापर लोहियांनी पंडित नेहरूंच्या डोक्यावर फोडले आहे. संसदेत हिंदी भाषेच्या चर्चेवेळी डॉ. लोहियांनी नेहरूंवर पुढीलप्रमाणे टीका केली आहे.

'नेहरू पाश्चिमात्य संस्कृती आणि इंग्रजी भाषेमुळे इतके प्रभावित झाले आहेत. भारतीय संस्कृती आणि भारतीय भाषाप्रेम हे केवळ राजकीय देखावा आहे. कारण हिंदी भाषेच्या द्वारे बॅकेतील करोडो मतांशी संबंध आहे. आणि दक्षिणेत त्यांना भाषेमुळे सुरक्षितता मिळाली आहे. भाषेचा मतांच्या राजकारणाशी नेहरूंचा चाललेला खेळ त्यांची प्रतिमा मलीन करणार आहे.

### *डॉ. लोहियांचे इंग्रजी हटावचे उपाय*

भारतातून इंग्रज गेले, परंतु इंग्रजी भाषेचा एक वेगळा समाज निर्माण केला. फोडा आणि झोडा नीतीद्वारे जातीय तेढ निर्माण केली. त्याचा प्रत्यय जातीय दंगलीतून येतो. परंतु स्वातंत्र्यानंतर सत्ताधारी राज्यकर्त्यांनी जात आणि भाषा यांचा स्वार्थी राजकारणासाठी चपखलपणे वापर केल्यामुळे आपले नुकसान झाले आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे जात आणि भाषा आहेत. जात आणि भाषेसंबंधी डॉ. लोहिया असे म्हणतात की कोणत्याही सत्ताधारी वर्ग केवळ बंदुकीच्या जोरावर सामान्य लोकांवर सत्ता गाजवू शकत नाही. भाषा व जात हीदेखील त्यांच्या शस्त्रागारातील प्रभावी आयुधे आहेत. या आयुधांनुसार राज्यकर्त्यांनी भाषानीतीचा अवलंब करून शासक वर्गाचे श्रीमंतवर्ग, इंग्रजी शिक्षित वर्ग आणि उच्चवर्णीय असे तीन वर्ग निर्माण केले. ते नष्ट करण्यासाठी इंग्रजीचे उच्चाटन हा डॉ. लोहिया यांच्या पुढील कळीचा प्रश्न होता. त्यांनी इंग्रजी उच्चाटनासाठी पुढील उपाय सुचविले आहेत. त्यामध्ये शासनाने स्वेच्छेने इंग्रजीचा त्याग करावा प्रभावी इच्छाशक्तीद्वारे इंग्रजीला नकार द्यावा तसेच सरकारला संघर्षाद्वारे इंग्रजीचा त्याग करण्यास भाग पाडले पाहिजे, असे म्हटले आहे. यावरून असे स्पष्ट होते की यामधील पहिला उपाय अशक्य आहे. कारण शासन स्वतःहून इंग्रजीचा त्याग करणार नाही. म्हणून डॉ. लोहियांनी 'अंग्रेजी हटावो ' आंदोलनाचा मार्ग स्वीकारून इंग्रजीला विरोध केला आहे. आणि देशव्यापक जनआंदोलनाची गरजही प्रतिपादन केली आहे.

डॉ. लोहियांच्या भाषा आणि इंग्रजी हटावच्या भूमिकेतून असे स्पष्ट होते की डॉ. लोहियांचा भाषेसंबंधी दृष्टीकोण परिपक्व आणि तर्कसंगत असा आहे. त्यांनी भाषा ही जैविक संस्कृतीशी निगडीत असते. भाषा ही ज्ञानाच साधन व्हावे याबाबतची भूमिका विवेकनिष्ठ आहे. तसेच इंग्रजी हटाव भूमिका मांडताना त्यांनी हिंदी भाषेच्या शब्दकोषात सहा लाख शब्द आहेत. तर इंग्रजीत अडीच लाख शब्द आहेत. असे स्पष्ट करून मातृभाषा किती आणि कशी समृध्द आहे हे सप्रमाण सिध्द केले आहे. त्यांनी लोकसभेत इंग्रजी हटावची भूमिका आग्रहाने मांडली

होती. परंतु बहुमताअभावी त्यांना अपयश आले होते.

आज देशाच्या विविध घटकराज्यातून प्रादेशिक अस्मिता आणि भाषेचा राजकारण उघड अवलंब केला जातो आहे. महाराष्ट्रातील शिवसेना किंवा नवनिर्माण सेना असो की, दक्षिणेतील तेलगु देसमसारखे प्रादेशिक पक्ष असो, त्यांनी भाषा या प्रभावी हत्याराचा अवलंब केलेला दिसून येतो.

डॉ. राममनोहर यांनी 'अंग्रजी हटाव ' भूमिका घेतली त्यास किती यश–अपयश आले हा चर्चेचा विषय असला तरी 'इंग्रजी हटविल्याशिवाय देशाची सामाजिक, आर्थिक प्रगती आणि खरी लोकशाही येणार नाही. या सर्वाचे मूळ भाषेमध्ये आहे. त्यांचा हा विचार राज्यकर्त्यांना आणि जनतेला दीपस्तंभासारखा मार्गदर्शक आहे. जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या विचारांचा प्रचार करून हिंदी मातृभाषा (राश्ट्रभाषा) आणि लोकभाषांना ज्ञानभाषेचा दर्जा देऊन भाषेच्या अनुकरणाची खरी आवश्यकता आहे.

### *संदर्भ सूची :*

1 जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश, खंड 15, पृ 851

2 लोहिया, डॉ. राममनोहर : दोन हत्यारे सत्ताधा–यांची भाषा आणि जाती, प्रेस्टीज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1971, पृ 65

3 भटनागर, राजेंद्रमोहन : अवधूत लोहिया, शिवानी बुक्स, नई दिल्ली, संस्करण 2005, पृ. 330

4 लोहिया, डॉ. राममनोहर : दोन हत्यारे सत्ताधा–यांची भाषा आणि जाती, प्रेस्टीज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1971, पृ 5



*प्रो. डॉ. भगवान माने*
*राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.*